**ठळक बातम्या**

- आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी ज्येष्ठ नागरिकांना दिलं जाणार नवीन कार्ड, लवकरच सुरू होणार नोंदणी प्रक्रिया

- सीबीआयच्या प्रकरणातही दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

- नियंत्रण रेषेवरच्या उर्वरित भागातलं सैन्य पूर्णपणे हटवण्यासाठी तत्काळ आणि दुप्पट जोमानं प्रयत्न करण्यावर भारत आणि चीन यांच्यात सहमती

**आणि**

- दक्षिण आशियाई ज्युनियर ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताला नऊ सुवर्णपदकं

**<><><><><>**

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र असणाऱ्या सर्व जेष्ठ नागरिकांना एक नवीन विशेष कार्ड दिलं जाणार आहे. आधार कार्डावरच्या जन्मतारखेनुसार ७० वर्ष आणि त्याहून अधिक वयाचे नागरिक या योजनेत अर्ज दाखल करण्यास पात्र असतील. ही योजना एका आठवड्यात सुरु होईल अशी अपेक्षा असून यासाठी पात्र व्यक्तींनी वेबसाइटवर अर्ज भरणं आवश्यक आहे. पोर्टलवर फेस ऑथेंटिकेशनची सुविधा उपलब्ध असून ७० वर्षांवरच्या नागरिकांसाठी विशिष्ट लिंक उपलब्ध आहे. खाजगी विमाधारक आणि कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे लाभार्थी देखील या योजनेचा लाभ घेऊ शकतील अशी

माहिती सूत्रांनी दिली आहे. मंत्रिमंडळानं याच आठवड्यात आयुष्मान भारत योजने अंतर्गत मिळकतीच्या कोणत्याही सीमेशिवाय जेष्ठ नागरिकांच्या या योजनेला मंजुरी दिली आहे.

**<><><><>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयच्या प्रकरणात जामीन मंजूर केला आहे. ईडी अर्थात सक्त वसुली संचलनालयाच्या प्रकरणात त्यांना यापूर्वीच जामीन मिळाला आहे. ईडीनं त्यांना २१ मार्च रोजी अटक केली होती. त्यानंतर कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी भ्रष्टाचार झाल्याची तक्रार सीबीआयनं त्यांच्याविरोधात दाखल केली आणि २६ जून रोजी अटक केली होती. याप्रकरणी १० लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर त्यांना जामीन मिळाला. या प्रकरणावर केजरीवाल यांनी कुठलेही जाहीर वक्तव्य करू नये, विशेष न्यायालयात सर्व सुनावण्यांना हजर रहावं, अशी अट सर्वोच्च न्यायालयानं घालून दिली आहे.

**<><><><>**

आधुनिक उपकरणं, संकरीत तंत्रज्ञान प्रणाली, गतिशीलता, उद्योग, ऊर्जा आणि सर्व्हर सारख्या क्षेत्रात प्रगत प्रोसेसर सह-विकसित करण्यासाठी आयबीएम आणि एल अँड टी सेमीकंडक्टर तंत्रज्ञान यांच्यात काल करार झाला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमावर ही माहिती दिली. ही भागीदारी जागतिक बाजारपेठांसाठी स्पर्धात्मक उत्पादने तयार करून भारताच्या सेमीकंडक्टर क्षमतांना चालना देईल, असंही त्यांनी या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

सणासुदीच्या काळात भेसळयुक्त मिठाई, मसालेदार आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मिती मोठ्या प्रमाणावर होतात. याला आळा घालण्याचे आणि विक्रीवर कडक नजर ठेवण्याचे निर्देश FSSAI, अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी वारंवार अंमलबजावणी आणि पाळत ठेवण्याची मोहीम राबवावी, अशा सुचनाही प्राधिकरणानं दिल्या आहेत. तसंच याला आळा घालण्यासाठी फिरती पथकं तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

**<><><><><>**

ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट या ई कॉमर्स कंपन्या काही निवडक कंपन्यांना पसंती देऊन गैर स्पर्धात्मक पद्धतींचा अवलंब करत असल्याचं भारतीय स्पर्धा आयोगाच्या निदर्शनाला आलं आहे. आयोगानं एका अहवालात या तपासाबद्दल माहिती दिली आहे.  या दोन्ही कंपन्यांनी काही निवडक कंपन्यांनाच उच्च मानांकन दिलं असून ग्राहक एखादी वस्तू ऑनलाईन सर्च करत असताना त्यांना या कंपन्यांना जास्त पसंती असल्याचं दिसून येतं. यामुळे इतर कंपन्यांची उत्पादनं या स्पर्धेत मागे पडतात, असं या अहवालात म्हटलं आहे. या दोन्ही कंपन्या सध्या या अहवालाचा अभ्यास करत असून त्यानंतर आयोगासमोर  आपली बाजू मांडणार आहेत.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, पूंछ जिल्ह्यात सुरनकोटच्या पोथा बायपास इथं सुरक्षा दलांनी काल संध्याकाळी जम्मू आणि काश्मीर गझनवी फोर्स संघटनेच्या एका दहशतवाद्याला स्फोटकं आणि दारूगोळ्यांसह अटक केली. प्राथमिक तपासात त्याची ओळख दर्याला नौशेरा इथला रहिवासी मोहम्मद शाबीर अशी

झाली आहे. तो पाकव्याप्त काश्मीर इथल्या प्रमुख दहशतवाद्याच्या संपर्कात होता. याबाबत अधिक तपास सुरू असून आणखी अटक होण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी वर्तवली आहे.

<><><><><>

देशाच्या किरकोळ चलनफुगवट्याच्या दरात ऑगस्ट महिन्यात किंचित वाढ झाली आहे. यंदा जुलैमध्ये तीन पूर्णांक सहा दशांश टक्के असलेला हा दर ऑगस्टमधे तीन पूर्णांक ६५ शतांश टक्के झाला आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं काल ही आकडेवारी जाहीर केली. गेल्या पाच वर्षातला हा दुसऱ्या क्रमांकाचा सगळ्यात कमी दर आहे. हा दर रिझर्व बँकेच्या २ ते ६ या नियंत्रण कक्षेत आहे.

<><><><><>

नियंत्रण रेषेवरच्या उर्वरित भागातलं सैन्य पूर्णपणे हटवण्यासाठी तत्काळ आणि दुप्पट जोमानं प्रयत्न करण्यावर भारत आणि चीन यांच्यात सहमती झाली आहे. रशिया मध्ये सेंट पीटर्सबर्ग इथं झालेल्या एका बैठकीत भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्यूरोचे सदस्य आणि केंद्रीय परराष्ट्र व्यवहार आयोगाचे संचालक वांग यी यांच्यात यावर सहमती झाली. दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध चांगले राहावेत यासाठी सीमाक्षेत्रांमध्ये शांतता प्रस्थापित करणं आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचा सन्मान करणं आवश्यक असल्याचं डोवाल म्हणाले. दोन्ही देशांनी संबंधित द्विपक्षीय करार, प्रोटोकॉल आणि परस्पर सामंजस्य यांचं पालन करायला हवं असं त्यांनी सांगितलं.

सुरक्षाविषयक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी सुरु असलेल्या ब्रिक्स देशांच्या उच्च-स्तरीय अधिकारी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या बैठकीनंतर ही बैठक झाली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या रशिया दौऱ्यानंतर ३५ भारतीय नागरिकांची रशियन सैन्यातून सुटका करण्यात आली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी ही माहिती दिली. मोदी यांच्या भेटीपूर्वी १० भारतीय नागरिकांना सोडण्यात आलं होतं. त्यामुळं सुटका झालेल्या भारतीयांची एकूण संख्या ४५ वर पोहोचली आहे. सुमारे ५० भारतीय नागरिक अजूनही रशियन सैन्यात आहेत आणि त्यांची लवकरात लवकर सुटका करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

युक्रेनला लांबवर हल्ला करणारी शस्त्रास्त्रं पुरवून पाश्चिमात्त्य देश रशिया-यूक्रेन संघर्षात थेट सहभागी होण्याचा धोका पत्करत आहेत, असा इशारा रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी दिला आहे. हा धोका लक्षात घेऊन रशियाला पुढचा निर्णय घ्यावा लागू शकतो, असं पुतीन रशियन स्टेट टीव्ही या वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले. यूक्रेन रशियावर हल्ला करण्यासाठी पाश्चिमात्य देशांकडून शस्त्रास्त्रांची मागणी करत असल्याची वृत्त प्रसारित झाल्याच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. यूक्रेनमधल्या युद्धात अमेरिका आणि युरोपीय देशांसह नाटो देशांचा थेट सहभाग असल्याचा निष्कर्ष काढून हा निर्णय घेतला जाईल, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

अमेरिकी अध्यक्षपदाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्यासह राष्ट्राध्यक्ष पदाच्या प्रेसिडेंन्शियल डिबेट अर्थात वादविवादात सहभागी होणार नसल्याचं रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलं. फिलाडेल्फियामध्ये झालेल्या सुरुवातीच्या वादविवादात विजयी झाल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आणि महत्त्वाच्या वृत्त वाहिन्यांवरचे आमंत्रण हॅरिस स्वीकारत नसल्याचा दावा केला. हॅरिस यांनी आणखी वादविवादांची मागणी केली. मतदारांप्रती ते कर्तव्य असल्याचं त्यांनी सांगितलं. एका सर्वेक्षणानुसार ६३ टक्के लोकांनी या वादविवादात हॅरिस यांनी चांगली कामगिरी केल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

सेनेगलचे अध्यक्ष बसीरो दिओमाये फाये यांनी संसद विसर्जित केली आहे. यामुळं आता निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सेनेगलच्या घटनेनुसार ९० दिवसात निवडणुका होणं अपेक्षित आहे. दूरचित्रवाणीवरुन प्रसारित केलेल्या भाषणात फाये यांनी ही घोषणा केली. विद्यमान संसदेत त्यांच्या विरोधी पक्षाला बहुमत होतं. कारागृहातून सुटल्यावर २ आठवड्यात ते अध्यक्षपदाची निवडणूक जिंकले होते.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, ब्रिटनमधल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

दक्षिण आशियाई ज्युनियर ॲथलेटिक्स स्पर्धेच्या कालच्या दुसऱ्या दिवशी भारताने नऊ सुवर्णपदकांची कमाई केली. महिलांच्या थाळीफेक प्रकारात अनिशा हिने ४९ मीटर ९१ सेंटीमीटरचं विक्रमी अंतर गाठत भारताला पहिलं सुवर्णपदक मिळवून दिलं. याच स्पर्धेत अमानत कंबोज हिने ४८ मीटर ३८ सेंटीमीटर थाळीफेक करत रौप्यपदक जिंकलं. महिलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत नीरू पहतक हिने ५४.५० सेकंदांची वेळ नोंदवून सुवर्णपदक तर ५४.८२ सेकंदांसह सँड्रा मोल साबू हिनं रौप्यपदक जिंकलं. पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीत नयन प्रदीप सरडे यानं १४.१४ सेकंदाची वेळ नोंदवत रौप्य पदकाची कमाई केली.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिंपिक मधल्या भारतीय खेळाडूंच्या उल्लेखनीय यशानं देशातल्या युवावर्गाला प्रेरित केलं आहे, असं केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री  रक्षा खडसे यांनी सांगितलं. नवी दिल्लीत काल पॅरालिंपिक मधल्या क्रीडापटूंचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या.

**//<><><><><>//**